# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### अधीक्षक वेतन पथक कार्यालय नाशिक येथील कर्मचारी पैशाची मागणी करीत असल्याबाबत

**(१) ८४३ (१८-०३-२०२०) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अधीक्षक वेतन पथक नाशिक शालार्थ प्राप्त शिक्षकांचे वेतन अदा करणेकामी ONLINE जोडणीसाठी प्रति शिक्षक रुपये १२००० ते १५००० मागणी करीत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षकांना चटोपाध्याय आयोगाच्या शिफारशीनुसार ८ वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी व त्यानंतर ८ वर्षानंतर निवड वेतनश्रेणी विनाअट पदोन्नती समजून मान्य करण्याबाबत

**(२) २७६२ (२०-०४-२०१५) श्री.नागोराव गाणार** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौथ्या आयोगाच्या अंमलबजावणीचा शासन निर्णय दिनांक २ सप्टेंबर, १९८९ नुसार शिक्षकांना त्यांच्या संपूर्ण सेवाकाळात पदोन्नतीची संधी नाही त्यामुळे त्यांना ८ वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी व त्यानंतर ८ वर्षाच्या सेवेनंतर निवड वेतनश्रेणी पदोन्नती समजून द्यावी अशी शिफारस चटोपाध्याय आयोगाने केली, हे खरे आहे काय,

(२) राज्य शासनाने दिनांक २ सप्टेंबर, १९८९ च्या शासन निर्णयानुसार १२ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर प्रशिक्षण व समाधानकारक सेवा या अटीवर वरिष्ठ वेतनश्रेणी व त्यानंतरच्या १२ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर फक्त २० शिक्षकांना समाधानकारक सेवा, सेवांतर्गत प्रशिक्षण व उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त करणे या अटीवर निवड वेतनश्रेणी लागू केली, हे खरे आहे काय,

(३) वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड वेतनश्रेणी देताना पदोन्नती समजण्यात येत नाही, त्यामुळे त्यांना आगावू वेतनवाढ देय नाही, हे खरे आहे काय,

(४) शासन निर्णय हा चटोपाध्याय आयोगाच्या शिफारशी अमान्य करणारा आहे तसेच विसंगत आहे, हे खरे आहे काय,

(५) शिक्षकांना चटोपाध्याय आयोगाच्या शिफारशीनुसार ८ वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी व त्यानंतर ८ वर्ष सेवेनंतर निवड वेतनश्रेणी विना अट पदोन्नती समजून देण्यात येईल काय ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-०३-२०२२)** : (१) हे खरे नाही.

(२) हे अंशतः खरे आहे. निवडश्रेणी ही त्या त्या संस्थेतील व संवर्गातील वरिष्ठ श्रेणीतील २० टक्के पदांना सेवाजेष्ठतेनुसार अनुज्ञेय असून व त्यासाठी सदर संवर्गामध्ये किमान ५ पदे असणे आवश्यक आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही. शिक्षकांसाठी प्रा.डी.पी.चट्टोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या राष्ट्रीय आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार केंद्र शासन दिनांक १२/०८/१९८७ च्या आदेशानूसार केंद्रातील शिक्षकांसाठी वरिष्ठ श्रेणी, निवडश्रेणी लागू केल्या असून, केंद्र शासनाच्या धर्तीवर शासन निर्णय दिनांक २ सप्टेंबर, १९८९ अन्वये राज्यातील शिक्षकांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेलमधील मान्यताप्राप्त शाळांमधील पालक-शिक्षक संघाच्या स्थापनेबाबत

**(३) ५०१४ (१३-१२-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेलमधील मान्यताप्राप्त खाजगी कायम विनाअनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील पालक-शिक्षक संघाच्या स्थापनेसंदर्भात शाळांकडून मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त नियमांचे उल्लघंन करणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) सेंट जोसेफ हायस्कुल पनवेल या शाळेचा मंडळ संकेतांक रद्द करण्याचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक), रायगड जिल्हा परिषद, यांनी विभागीय सचिव, महाराष्ट्र माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ यांचेकडे सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना "डीसीपीएस" कपातीची रक्कम अदा करण्याबाबत

**(४) ५०२२ (१४-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दहा टक्के "डीसीपीएस" रक्कम दर महिन्याला कपात केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचारी मृत पावल्यास वेतनातून कपात केलेली "डीसीपीएस" रक्कम त्याच्या कुटूंबियांना मिळत नसून सन २००५ ते सन २०२० पर्यंतची पंधरा वर्षाची कपातीची रक्कम व हिशोब याचा ताळमेळ बसत नसल्याने शिक्षण विभागाचा गैरकारभार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मृत कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना "डीसीपीएस" कपातीची रक्कम देण्यात यावी अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी/अधिकारी महासंघ, चिमूर येथील कोषाध्यक्ष कवडू लोहकरे यांनी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने मृत कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना "डीसीपीएस" कपातीची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-०३-२०२२) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) होय, निवेदन प्राप्त आहे.

(४) डिसीपीएस खात्यावर शिल्लक असलेली रक्कम व्याजासह देण्याची कार्यवाही विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे मंजूरीनंतर वेतन पथक (माध्यमिक) मार्फत वितरीत केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधीचे प्रलंबित असलेले प्रस्ताव निकाली काढण्याबाबत

**(५) ८६३६ (१५-०६-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील काही महिन्यांपासून शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधीचे प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून प्रस्ताव तातडीने निकाली काढण्याबाबतची मागणी प्राथमिक शिक्षक संघाने निवदेनाद्वारे शिक्षण विभागातील वित्त विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार मूळ वेतनाच्या कमीत कमी सहा टक्के किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दरमहा भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करीत असतानाही शिक्षकांच्या हक्काची रक्कम आवश्यकत्या वेळी काढण्याकरीता वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावांना मंजूरी देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३)असल्यास, कोरोनाबाधित झालेल्या शिक्षकांनी खाजगी दवाखान्यात घेतलेल्या उपचाराच्या खर्चाकरीता संबंधित अधिकाऱ्यांना निधीकरीता निवेदन देवून मागणी केलेले प्रस्ताव निकाली काढावे, याकरीता प्राथमिक शिक्षक संघाने निवेदनाद्वारे शिक्षण विभागातील वित्त अधिकाऱ्यांकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भविष्य निर्वाह निधीचे प्रस्ताव तात्काळ निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील लॉकडाऊन मुळे शासकीय/ निमशासकीय कार्यालयात उपस्थितीवर निर्बंध घालण्यात आले होते. सबब,

सन २०२०-२१ मध्ये भविष्य निर्वाह निधी संबंधिची देयके कोषागारात सादर करता येणे शक्य झाले नाही. त्यामुळे सन २०२०-२०२१ मधील प्रलंबित देयके व चालू आर्थिक वर्षातील देयके या आर्थिक वर्षात पारित करण्यासाठी कोषागारात एकत्र जमा झाली आहेत.

(३) अशा स्वरुपाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(४) विभागाच्या मागणीनुसार वित्त विभागाने ८३३६००३८ व ८३३६०१५४ या लेखाशिर्षाखाली अनुक्रमे रुपये १४१०.४१ कोटी व रुपये १८५.७१ कोटी इतका अतिरिक्त निधी Grant Modification द्वारे उपलब्ध करुन दिलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिंवडी (जि.ठाणे) तालुक्यातील कशेळी-काल्हेरमध्ये अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(६) ८७१८ (१५-०६-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंवडी (जि.ठाणे) तालुक्यातील कशेळी-काल्हेरमध्ये कांदळवने आणि पाणथळभूमीवर पर्यावरणाचा -हास करुन लॉकडाऊन काळात विनापरवानगी अनधिकृत इमारती उभारुन लाखो नागरिकांची भूमाफियांनी फसवणूक केल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील असलेली पाणथळभूमी आणि कांदळवने नष्ट करुन त्यावर भराव टाकून अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या इमारतीसंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन सदरहू अनधिकृत इमारती तात्काळ निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१०-०३-२०२२) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मौजे कशेळी सर्व्हे क्र. १९३ ब व सर्व्हे क्र. ११० पै., १११, ११२ या ठिकाणी लॉकडाऊनच्या काळात अतिक्रमणाच्या एकूण ७ घटना आढळून आल्या आहेत.

तथापि, विनापरवानगी अनधिकृत इमारती उभारुन भूमाफियांनी नागरिकांची फसवणूक केल्याबाबतची कोणतीही तक्रार वन विभागास प्राप्त झालेली नाही.

लॉकडाऊनच्या कालावधीत आढळून आलेल्या अतिक्रमणाच्या उक्त घटनांविरुध्द ७ वनगुन्हे नोंदविण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांपैकी २ वनगुन्हे निकाली काढले इतर ५ प्रकरणांत वनक्षेत्रपाल, भिवंडी यांच्या कार्यालयामार्फत चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वेरुळ (ता.खुलदाबाद, जि.औरंगाबाद) येथील शहाजीराजे भोसले स्मारकाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(७) ८९१६ (१०-०६-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेरुळ (ता.खुलदाबाद, जि.औरंगाबाद) येथील शहाजीराजे भोसले स्मारकाचे काम गत बारा वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहाजीराजे भोसले यांच्या पूर्णकृती पुतळयाचे दिनांक १७ सप्टेंबर, २००८ रोजी अनावरण झाले असून पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात स्मारकाची संरक्षण भिंत, मुख्य प्रवेश द्वार, चबुतऱ्याचे बांधकाम, शहाजी राजेंचा ब्रास धातुचा पुतळा, अंतर्गत रस्ते, बागबगीचा, पाणीपुरवठा, म्युझियम इमारत व सांस्कृतिक हॉल इत्यादींच्या कामावर रुपये २ कोटी ५० लाख एवढे खर्च झाले असून रुपये ४९ लाख दहा वर्षापासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अखर्चित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी वेरुळ येथे काही दिवसांपूर्वी भेट देऊन स्मारकासह मालोजी राजे यांच्या गढीचा विकास करण्याचे सुतोवाच करूनही त्यावर कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने स्मारक जागतिक दर्जाचे व गढीचा विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०७-०३-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शहाजीराजे भोसले स्मारक, परिसर संवर्धन व सुशोभिकरण करणे, शहाजीराजे यांचा पुतळा बसविणे या विविध कामांना तीन टप्प्यांमध्ये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. यातील पहिल्या टप्प्यातील संरक्षण भिंत व मुख्य प्रवेशद्वार ही कामे सन २००७ मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत. दुसऱ्या टप्प्यात मंजूर कामांपैकी उपलब्ध निधीमधून चबुतऱ्याचे बांधकाम, शहाजी राजेंचा ब्रॉन्झ धातुचा पुतळा, कारंज्यासाठी पुतळयासमोर हौद व अंतर्गत रस्ते इ.कामे सन २००८ मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत. तिसऱ्या टप्प्यातील मंजूर सहा कामांपैकी स्मारक परिसरात मराठ्यांचा इतिहास दर्शविणारी म्युझियम, संभाजीराजे म्युझियमचे बांधकाम व स्मारक परिसरात फाऊंटन ही तीन कामे सन २०१० मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत. मा.पालकमंत्री, औरंगाबाद यांच्या दिनांक ०७/०२/२०१४ रोजीच्या बैठकीमधील सुचनेनुसार महाराष्ट्र कल्चरल मिनी थिएटरचे काम थांबविण्यात आलेले आहे. या कामाऐवजी स्मारक परिसराचे सुशोभिकरण करणे, पुतळयाच्या समोर व पाठीमागे कारंजे बसविणे, परिसरात बगीचा तयार करणे, पाणीपुरवठा करणे व परिसरात विद्युतीकरण करणे इ.कामे सुचित केली आहेत. त्यानुसार एक पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत कामे स्मारक परिसर देखभाल व दुरुस्तीसाठी इतर यंत्रणेकडे हस्तांतरीत केले नसल्यामुळे पूर्ण झालेली कामे खराब होऊ नये त्यामुळे हाती घेण्यात आली नाही.
(२) सदर कामावर तीन टप्प्यात एकत्रित रुपये ३०४.५७ लक्ष एवढा निधी मंजूर होता.त्यापैकी रुपये २९४.१५ लक्ष इतका निधी प्राप्त झाला असून रुपये २४४.७७ लक्ष एवढा निधी खर्च झाला आहे. उर्वरित अखर्चित रुपये ४९.३८ लक्ष निधी विभागाकडे शिल्लक आहे.

(३) व (४) मालोजीराजे भोसले गढी हे राज्य संरक्षीत स्मारक असून या गढीच्या संवर्धनाबाबत दिनांक १६/०२/२०२१ रोजी मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांनी वेरुळ येथे बैठक घेऊन प्रस्तावित कामांचा आढावा घेतला असून त्यानुसार आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. मौजे वेरुळ, ता.खुलताबाद येथील शहाजीराजे भोसले समारक व अनुषंगिक कामांना रुपये २६.४७ लक्ष रकमेस दिनांक २०/०३/२०२१ रोजी जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या कामासाठी जिल्हा परिषद, औरंगाबाद ही कार्यान्वयन यंत्रणा आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड जिल्हा परिषदेच्या गौण खनिज विकास निधीचा अपहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(८) ९२१४ (१४-०६-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हापरिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील गौण खनिज विकास निधी अंतर्गत तालुक्यात करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामात अनियमितता झाल्याप्रकरणी मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता, बीड यांच्यावर गुन्हा नोंद करण्याबाबत माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, बीड यांनी शासनास पत्राद्‌वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड तालुक्यात करण्यात आलेल्या दोन्ही रस्त्यांची कामे राज्य रस्ते विकास महामंडळ आणि दुसरा रस्ता ५-६ वर्षापूर्वीच पूर्ण झालेला असताना गौण खनिज विकास निधीचा वापर उपरोक्त रस्त्यांच्या कामाकरीता केल्याचे दाखवून निधीचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गौण खनिज विकास निधीच्या रस्ता कामात अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाल्यामुळे दोषींवर कारवाई करण्याकरीता बांधकाम

विभागाच्या मुख्य अभियंता यांना अहवाल पाठविण्याच्या सूचना शासनाने केल्या होत्या, तसेच निधीचा अपहार केल्याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांना नोटीस देवूनही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बीड जिल्हा परिषदेच्या गौण खनिज विकास निधीचा अपहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१०-०३-२०२२) :** (१) होय.

जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ०८/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणात मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.वि. औरंगाबाद, संबंधित कार्यकारी अभियंता व उपकार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, बीड यांच्यावर गुन्हा नोंद दाखल करण्याची परवानगी देण्याची शासनास विनंती केली आहे.
(२), (३) व (४) यासंदर्भात अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असता, त्यांच्या दिनांक १६/०६/२०२१ च्या अहवालानुसार, सदर प्रकरणी निधीचा अपहार झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, या प्रकरणातील दोन्ही कामांमध्ये मंजूर साखळी क्रमांकामध्ये काम न करता, इतरत्र काम करण्यात आल्याचे आढळून येते. त्याअनुषंगाने, या प्रकरणी अनियमिततेस जबाबदार असणाऱ्यांविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळासोबतची उर्दू एज्युकेशन बोर्डाची समकक्षता रद्द केल्याबाबत

**(९) ९२७९ (२०-०७-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ५२३२ ला दिनांक ८ डिसेंबर, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कौन्सिल ऑफ एज्युकेशनल इन्स्टिटयुट अॅण्ड बोर्ड या संस्थेची नोंदणी नसल्याने राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळासोबतची उर्दू एज्युकेशन बोर्डाची समकक्षता रद्द केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या उक्त निर्णयाविरुध्द उर्दू बोर्डाला संलग्न असलेल्या संस्थाचालकांकडून मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यावर याचिकाकर्त्यांची बाजू ग्राहय धरुन दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी मा.उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती देवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ न देण्याच्या सूचनाही स्थगिती आदेशासोबत दिल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार शासनाने त्याबाबत पुढील कार्यवाही करणे अपेक्षित असताना शासनाच्या दुर्लक्षपणामुळे सन २०१७ मध्ये उर्दू बोर्डातून दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अकरावीच्या प्रवेशापासून वंचित रहावे लागत असल्याचे दिनांक २९ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १३/०९/२०१७ च्या अंतरिम आदेशानुसार उर्दू मंडळाचे विद्यार्थ्यांचे फेब्रुवारी/ मार्च २०१७ च्या परीक्षेचे आवेदनपत्र भरुन नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्यमंडळाकडून सर्व विभागीय मंडळाना दिनांक १३/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

## विनाअनुदानित व अंशतः अनुदानित तत्त्वावर नियुक्ती झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(१०) १००१३ (२०-०७-२०२१) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नोव्हेंबर २००५ पूर्वी विनाअनुदानित व अंशतः अनुदानित तत्त्वावर नियुक्ती झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अद्यापपर्यंत सातवा वेतन आयोग लागू झाला नसल्याचे माहे मे, २०२१ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार नोव्हेंबर २००५ पूर्वी विनाअनुदानित व अंशतः अनुदानित तत्त्वावर नियुक्ती झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) शासन निर्णय दिनांक २२/०२/२०१९ व शासननिर्णय दिनांक ०६/०८/२०१९ द्वारे अनुदानित अशासकीय शाळांमधील पूर्णवेळ व अर्धवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आली आहे.

---

## राज्यात मुंबई महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्नाचा पुरवठा करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११) १०२५० (०२-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेने आपल्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शिजवलेल्या अन्नाचा पुरवठा करण्यासाठी महिला बचत गटांना सुमारे २२३ कोटी ६३ लाखांचे कंत्राट देण्याचा निर्णय घेतल्याचे माहे मार्च, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत मागील मार्चमध्ये करोनाचा पहिला रुग्ण सापडल्यानंतर टाळेबंदी लागू झाल्याने पोषण आहार वाटप न केल्याने शिल्लक राहिलेल्या निधीचा अहवाल बचत गटांनी सादर केला आहे काय, तसेच, सध्या दुसरी लाट सुरु असून टाळेबंदी करण्यात आली असतानाही शालेय पोषण आहारावर तात्काळ निधी खर्च करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रियेव्दारे शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीव्दारे तयार आहाराचा पुरवठा करण्याऱ्या संस्थांची निवड करण्यात आली आहे.

(२) केंद्र शासनाने दिनांक ३१ जुलै, २०२० रोजीच्या पत्राद्वारे कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावामुळे शाळा बंद असल्यातरी सदर काळात विद्यार्थ्यांना पौष्टिक अन्न मिळणे आवश्यक असल्याने आहार खर्चाच्या रक्कमेमधून विद्यार्थ्यांना कोरडा आहार देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार कोविड-१९ काळात योजनेची अंमलबजावणी सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिकेतून घनकचरा प्रकल्पाची फाईल गहाळ झाल्याबाबत

**(१२) १०२९५ (०६-१२-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेमध्ये केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचऱ्याची समस्या निकाली काढण्याच्या उद्‌देशाने प्रकल्प उभारणीसाठी केंद्र व राज्य शासनाने महानगरपालिकेसाठी ४५ कोटीचा निधी मंजूर केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पासंबंधी माहे सप्टेंबर, २०२० मध्ये परभणी ॲग्रोटेक प्रा.लि. कंपनी सोबत करण्यात आलेल्या करारनाम्याची प्रत बांधकाम विभागातून गायब झाल्याची धक्कादायक माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानूसार सर्व बाबींचा अंतर्भाव असलेला करारनामा अकोला महानगरपालिकेमधून गायब झाल्याने सदर प्रकल्पाचे काम पूर्णत्वास आणण्याच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०३-२०२२) :** (१) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत अकोला महानगरपालिकेचा रूपये ४५.३५ कोटी इतक्या रक्कमेचा घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर प्रकल्पास दिनांक ३०/१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे.

(२) व (३) अकोला महानगरपालिकेने मे. परभणी ॲग्रोटेक प्रा.लि.कंपनी, औरंगाबाद यांच्यासोबत करारनामा करून दिनांक २२ सप्टेंबर, २०२० रोजी कार्यादेश प्रदान करण्यात आले आहेत.

सदर करारनाम्याची मूळ प्रत बांधकाम विभागामध्ये सुरक्षीत असल्याचे, महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर-बार्शी-मार्गे टेंभुर्णी या सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाबाबत

**(१३) १०३६९ (०५-०१-२०२२) श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर-बार्शी मार्गे टेंभुर्णी येथे सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याच्या कामास शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मंजूरी दिलेल्या कामाचे स्वरुप काय आहे व उक्त काम सुरु होऊन पूर्ण होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०१-०४-२०२२) :** (१) सदर रस्त्याचे काँक्रिटीकरणाने चौपदरीकरण करण्याच्या कामास शासनाने अद्याप मंजुरी दिलेली नाही. तथापी, त्याबाबतची घोषणा मा.केंद्रीय मंत्री,रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय,नवी दिल्ली यांनी लातूर येथे दिनांक २५/११/२०२१ रोजी केली आहे.
(२) अनु.क्र.१ च्या उत्तरात नमूद केल्यानुसार सदर कामास मंजुरी प्राप्त नसल्याने याबाबत प्रश्न उद्‌भवत नाही. तथापी सदर रस्त्याचे काँक्रिटीकरणाने चौपदरीकरण करण्याच्या कामाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच, सद्य:स्थितीत लातूर-बार्शी राष्ट्रीय महामार्ग क्र.६३ वर विमानतळ जंक्शन ते मुरुड अकोला या सहा कि.मी.लांबीमध्ये डांबरीकरणाने चौपदरीकरण करण्याचे काम प्रगतीपथावर असून सदर काम लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे जतन करणेबाबत**

**(१४) १०४६८ (०६-०१-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषाचे साहित्य संपूर्ण जगात मार्गदर्शक असून सदर साहित्य विचारधन सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे या हेतुने महाराष्ट्र शासनाने दिनांक १५ मार्च, १९७५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचे मागील ४४ वर्षात केवळ २२ खंड व ३ सोअर्स मटेरियल एवढीच कामगिरी झाली असून सन २००६ पासून म्हणजेच मागील १५ वर्षापासून एकही नवीन खंड प्रकाशित झाला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाबासाहेबांच्या साहित्याला (खंडांना) जास्त प्रमाणात मागणी असताना राज्य शासन व प्रकाशन समितीस या खंडांच्या पुर्नमुद्रण आणि प्रकाशित मराठी खंडाचा इंग्रजी अनुवाद व इंग्रजी खंडाचा मराठी अनुवाद करण्यात अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील १६ वर्षापासून खंडाच्या मराठी अनुवादाचे मुद्रीत प्रकाशन समितीकडे मान्यतेसाठी प्रलंबित असून आजपर्यंत प्रकाशित झालेल्या एकही इंग्रजी खंडाचा मराठी अनुवाद झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे जतन करुन सर्व सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०४-०३-२०२२) :** (१) डॉ. बाबासाहेब आबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना दिनांक १५ मार्च, १९७६ रोजी झाली आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) इंग्रजी खंड क्र.६चा मराठी अनुवाद प्रकाशित झाला असून इंग्रजी खंड क्र.१३च्या (दोन भाग) मराठी अनुवाद लवकरच प्रकाशित होत आहे.

(५) हे खरे आहे.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## सेलू ते बोरधरण (ता.हिंगणी, जि.वर्धा) या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१५) १०८८५ (०५-०१-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू ते बोरधरण (ता.हिंगणी, जि.वर्धा) या ५ कि.मि.रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून बोरी गावातील मोडका या अरूंद पुलामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर रस्त्याची व पुलाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२२) :** (१) अतिवृष्टीमुळे सदर रस्त्याचा डांबरी पृष्टभाग व बोरी गावाजवळील पुल क्षतीग्रस्त झाला, हे खरे आहे. परंतु त्यामुळे अपघात होतात हे खरे नाही.

(२) क्षतीग्रस्त झालेल्या पुलाच्या ठिकाणी पाईप टाकुन तात्पुरती दुरुस्ती करुन वाहतूक पूर्ववत करण्यात आली होती. सद्य:स्थितीत येथे नवीन Box Culvert चे काम पूर्ण करण्यात आले आहे.

तसेच सदर रस्त्याचा भाग वन क्षेत्रामध्ये येत असल्यामुळे, वन विभागाची आवश्यक परवानगी प्राप्त करुन प्रश्नांकित लांबीत खड्डे भरुन डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चामोर्शी-हरणघाट (जि.गडचिरोली) या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१६) १०९४६ (०६-०१-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चार्मोशी-हरणघाट (जि.गडचिरोली) या १४ कि.मी अंतरावरील रस्त्यावर खड्डे पडून दुरवस्था झाल्याने वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चोकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार सदर रस्त्याची दुरूस्ती तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०३-२०२२) :** (१) सदर रस्त्याची लांबी अतिवृष्टीमुळे पुराच्या पाण्याखाली गेल्याने क्षतीग्रस्त झाली, हे खरे आहे.

(२) व (३) क्षतीग्रस्त झालेल्या १४ कि.मी. लांबी पैकी ६ कि.मी. लांबीत रस्त्याचे दुरूस्तीचे मंजूर कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करुन काम लवकरच सुरु करण्यात येत आहे

उर्वरित लांबीचे दुरुस्तीचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

## मुंबईतील शिवडी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत

**(१७) १०९९९ (०६-०१-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी येथील बीडीडी चाळ हि बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या लिजच्या जागेवर असल्यामुळे सदर धोकादायक इमारतींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने बीडीडी चाळींची जागा बीपीटीकडून हस्तांतरीत करुन घेऊन पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०४-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शिवडी येथील बीडीडी चाळी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर असल्याने सदर चाळींचा पुनर्विकास प्रक्रियेत समावेश करण्यासाठी प्रथम केंद्र शासनाची परवानगी मिळणे तसेच शिवडी बीडीडी चाळीची जागा राज्य शासनाच्या नावे होणे आवश्यक आहे. यानुषंगाने शिवडी येथील बीडीडी चाळींची जमीन राज्य शासनास हस्तांतरीत करण्याकरीता केंद्र शासनास दिनांक २७/१/२०१७ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये विनंती करण्यात आली.

शिवडी बीडीडी चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल तयार करून तो मुंबई बंदर न्यासास दिनांक १६/०२/२०१८ रोजी पाठविण्यात आला आहे. राज्य शासनाने देखील दिनांक १९/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदरहू सुसाध्यता अहवाल केंद्र शासनास पाठविला आहे.

तसेच दिनांक ०५/०८/२०२१ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये शिवडी येथील बीडीडी चाळ प्रकल्पास केंद्र शासनाची मंजुरी मिळविणे तसेच शिवडी बीडीडी चाळीची जमीन राज्य शासनास पुनर्विकासाकरीता हस्तांतरीत करणे याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याची विनंती मुंबई बंदर न्यास यांना करण्यात आली आहे.

शिवडी बीडीडी चाळ प्रकल्पास केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर व त्याबाबत मुंबई बंदर न्यासाने राज्य शासनास/म्हाडास सूचित केल्यानंतरच सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणे राज्य शासनास शक्य होणार आहे.

---

## नागपूर येथे एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत सकस व दर्जेदार आहार पुरवठा करण्याबाबत

**(१८) ११०७३ (२३-११-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे गरोदर माता, स्तनदा माता व ६ वर्षाखालील मुलांसाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत देण्यात येणारा पोषण आहार निकृष्ट व भेसळयुक्त असल्याचे दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदरील योजनेच्या लाभार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आहार पुरवठादारावर कारवाई करुन एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत सकस व दर्जेदार आहार पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)(१६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) नागपूर येथे एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत देण्यात येणारा आहार निकृष्ट व भेसळयुक्त असल्याबाबत दिनांक ०४/०९/२०२१ वा त्यासुमारास तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, माहे जुलै,२०२१ मध्ये IBN लोकमत या वृत्त वाहिनीवर निकृष्ट आहाराबाबत बातमी प्रसिध्द झाली होती. त्यानुषंगाने संबंधित बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी दिनांक ०६/०७/२०२१ रोजी आहाराचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेवून शासनाच्या सार्वजनिक

आरोग्य विभागाच्या नागपूर येथिल प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविले होते, त्यानुसार सदर आहार Food Safety & Standards Regulation २०११ प्रमाणे खाण्यास योग्य असल्याबाबत प्रयोगशाळेकडून प्रमाणित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासनाने प्रलंबित असलेल्या रेल्वे प्रकल्पांसाठी निधी देणे बंद केल्याबाबत

**(१९) १११६९ (०५-०१-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)राज्यातील प्रलंबित असलेल्या रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्र व राज्य शासनाने मिळून महारेल कार्पोरेशन तयार केले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, केंद्र व राज्य शासनाच्या हिश्यातून राज्याकरीता १ लाख कोटींची कामे निश्चित केली असूनही शासनाने सद्या प्रलंबित असलेल्या प्रकल्पांसाठी आपल्या हिश्श्याचा निधी देणे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निधी बंद करण्याचे कारण काय आहे याबाबत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०२-०३-२०२२) :** (१) होय.
(२) नाही. राज्य शासनाने आर्थिक सहभाग देण्यास मान्यता दिलेल्या रेल्वे प्रकल्पांना राज्य हिश्श्याचा निधी देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन कर प्रणालीमध्ये सिडको आणि महानगरपालिकेमध्ये कोणत्याही प्रकारचा समन्वय नसल्याने नागरिकांवर अतिरिक्त शुल्काचा भार पडत असल्याबाबत

**(२०) ११३४८ (२०-११-२०२१) श्री.बाळाराम पाटील** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीत नवीन कर प्रणाली लागू झाली असून मालमत्ताधारकांना वार्षिक भाडे मूल्यांमध्ये सर्वसाधारणपणे ३० टक्के दर कमी करून देण्यात आला असून कर भरणा ऑनलाइन प्रणालीद्वारे करणे सुलभ होण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे व या कर प्रणालीला नागरिकांनी विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको आकारत असलेल्या सर्विस टॅक्सबाबत महानगरपालिकेने आपली भूमिका स्पष्ट करावी तसेच याव्यतिरिक्त उपकर अवाजवी असल्याचे तेथील स्थानिक नागरिकांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर आकारणीत गोंधळ निर्माण झाल्याने सिडको आणि महानगरपालिकेमध्ये कोणत्याही प्रकारचा समन्वय नसल्याने नागरिकांवर अतिरिक्त शुल्काचा भार पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार नागरिकांवर अतिरिक्त शुल्काचा भार पडू नये यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२)** : (१) पनवेल महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना आकारण्यात येणाऱ्या कर प्रणालीच्या अनुषंगाने विविध स्तरामधून तक्रारी, हरकती व सूचना महानगरपालिकेस प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) अशा प्रकारचे निवेदने महानगरपालिकेस प्राप्त झाली आहेत.

तथापि, सिडको आकारत असलेल्या सेवा शुल्क (Service Charge) व पनवेल महानगरपालिकेचा मालमत्ता कर हे दोन्ही कर भिन्न आहेत.

सिडकोचा सेवा शुल्क हा त्यांच्यामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व सुविधांच्या अनुषंगाने आकारण्यात येतो. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार मालमत्ता कर महानगरपालिकेमार्फत आकारण्यात येतो.

पनवेल महानगरपालिकेने कोणताही "उपकर" मालमत्ता धारकांकडून आकारलेला नसल्याचे पनवेल महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) पनवेल महानगरपालिका आकारत असलेला मालमत्ता कर हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार आहे. तसेच कोणत्याही अतिरिक्त शुल्कांची वसूली महानगरपालिकेमार्फत केली जात नाही. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात विविध याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याची बाब पनवेल महानगरपालिकेने कळविली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.